कार्यालय मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला
इ :मेल-directorcrs78@gmail.com


जा.क्र. मसंकें/सामान्य/ 1525 /२०२५ दि.०८/११/२०२५

## निविदा सूचना

**विषय: सन २०२५-२६ मध्ये मध्यवर्ती संशोधन केंद्र अंतर्गत प्रक्षेत्रावरील रस्ते व रोड रोलर संबंधित कामे कंत्राटी पद्धतीने करण्यासाठी निविदा दर (कोटेशन) बोलविण्याकरिता व्यापक प्रसिद्धी करणेबाबत.**

**संदर्भ:** कुलसचिव कार्यालय जा.क्र.बीईए/आस्था/कंत्राटी/कर्म/२०२१/१५९४ दि. २२.०६.२०२१

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, मध्यवर्ती संशोधन केंद्र डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत विविध विभागाचे प्रक्षेत्रावरील रस्ते व **रोड रोलर** संबंधित कामे कंत्राटी पद्धतीने पद्धतीने करण्याकरिता निविदा दर खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत असून निविदा मसुदा/निविदेचे स्वरूप सोबत जोडण्यात आलेले आहे.

## अटी व शर्ती

1 निविदा पत्रक/कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.३० या वेळेत स्वीकारल्या जातील.

2 निविदा/कोटेशन संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला यांचे नावाने सीलबंद लिफाफामधे पाठवावी व लिफाफ्यावर " **रोड रोलरची कामे**" असा उल्लेख करावा.

3 निविदाधारक/कंत्राटदाराकडे संबंधीत कामाचा वैध परवाना असणे बंधनकारक आहे. निविदाधारक/कंत्राटदाराला परवाना व संबंधित इतर सर्व आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

4 मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय अंतर्गत प्रक्षेत्रावरील सदर काम करीत असतांना पिकाचे/फळबागेचे किंवा विद्यापीठ मालमत्तेचे नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित निविदाधारक/कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.

5 मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय अंतर्गत प्रक्षेत्रावरील सदर काम करतेवेळी कुठलीही दुर्घटना/अपघात जीवितहानी झाल्यास हे कार्यालय अधिकारी/कर्मचारी किंवा विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. याची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदाधारक/कंत्राटदाराची राहील.

6 मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय अंतर्गत देण्यात आलेले सदर काम वेळेत पूर्ण करण्यात यावे. कामाबाबत काही तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

7 विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित निविदाधारक/कंत्राटदाराची राहील.

8 निविदाधारक/कंत्राटदारानी देयक सादर करते वेळी बँक खात्याची संपूर्ण माहिती सादर करावी अन्यथा देयक अदा करण्यात येणार नाही.

9 या कार्यालयातर्फे निविदाधारक/कंत्राटदारास सदर काम करण्याकरिता कोणत्याही प्रकारचे साहित्य/मनुष्यबळ पुरविण्यात येणार नाही .सदर काम करण्याकरिता आवश्यक साहित्य/मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदाधारक/कंत्राटदाराची राहील.

10 निविदाधारक कंत्राटदारास/सदर कामाचे देयक काम पूर्ण व विहित वेळेत पूर्ण केल्यावर तसेच संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच कामाचे देयक पारित करण्यात येईल व संपूर्ण कार्यालयीन प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच देयक अदा करण्यात येईल.

11 उपरोक्त काम करीत असतांना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी/मा. संशोधन संचालक, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचा राहील आणि तो सर्वाना मान्य करणे बंधनकारक राही.

12 मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय अंतर्गत प्रक्षेत्रावर सदर कामाकरीताचे दर एक वर्षा करिता वैध राहतील.

13 वरीलप्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशिला नुसार दि. **१४.११.२०२५** रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा सीलबंद लीफाफामध्ये सादर करावी.

14 कोटेशन तपशिलासंबंधी अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला कार्यालयाशी संपर्क साधावा

**संचालक**
**मध्यवर्ती संशोधन केंद्र**
**डॉ.वि.कृ.दे.पं ., अकोला**

# निविदा मसुदा (कोटेशन)

मध्यवर्ती संशोधन केंद्र डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील रस्ते व रोड रोलर संबंधित कामे कंत्राटी पद्धतीने करण्याकरिता दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशील | प्रमाण | दर (.रु) |
|---|---|---|---|
| १ | प्रक्षेत्रावरील रोड रोलरची कामे | प्रति/तास | |

निविदा सुचनेमधील संपूर्ण अटी व शर्ती मला सर्वस्वी मान्य आहेत.

ठिकाण:
दिनांक:

**स्वाक्षरी**
नाव व संपूर्ण पत्ता